Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII | ISSUE- II | FEBRUARY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# ओबीसी समाजोद्धारक : गोपीनाथ मुंढे

**प्रा.डॉ. पांडुरंग मुंढे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव
ता.जि. लातूर

**प्रस्तावना** (Introduction) :

बहुजन समाज उद्धारक गोपीनाथ मुंढे अशी ओळख असणा-या साहेबांनी आयुष्यभर दीन-दलित व मागासवर्गासाठी संघर्ष करून त्यांना आपले अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कारण त्यांचा जन्म इतर मागास वर्गातील 'वंजारी' या जातीमध्ये झाला. त्यामुळे या समाजाच्या समस्या त्यांनी अत्यंत जवळून अनुभवल्या होत्या. म्हणून या समाजातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा त्यांना न्याय मिळवून देण्याचा त्यांनी विडाच उचलला होता.

तळागळातील गरीब, कष्टकरी माणूस हा त्यांच्या समाजकारण व राजकारणाचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या उद्धारासाठी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या सत्तेशी संघर्ष केला. कोणत्याही एका जातींचा, वर्गाचा प्रतिनिधी म्हणून नाही तर सर्व वंचित, बहुजन लोकांचा आधार म्हणून त्यांचा आवाज, वेदना समाजासमोर मांडण्याचे काम अविरतपणे त्यांनी केले. त्यामुळे बहुजन नायक म्हणून गोपीनाथ मुंढे साहेबांना ओळखले जाते.

जन्म बहुजन मागास समाजामध्ये झाला असल्यामुळे ब्राह्मणवादी विचारांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास झाला असला तरी व बहुजन विरोधी पक्षाचे नेतृत्व करून पक्षालाच बहुजनवादी बनवून ओबीसी समाजाला सामाजिक तसेच राजकीय प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. राष्ट्रीय पातळीवर ओबीसी समाजाचे संघटन करून राज्यघटनेमध्ये स्वतंत्र ओबीसी शेड्यूल तयार करावा, ओबीसींची जातीनिहाय जनगणना व्हावी म्हणून अविरत संघर्ष केला.

ज्या समाजामध्ये जन्मलो त्या समाजाचा उद्धार करणे माझे कर्तव्य आहे. या भावनेने डॉ. आंबेडकरांच्या विचाराची प्रेरणा घेऊन समाजातील दुःखी दीन, दलित समाजाचा वारसदार म्हणून मा. गोपीनाथ मुंढे यांनी कार्य केले त्याला आधुनिक राजकीय इतिहासात तोड नाही.

ओबीसीचा आवाज संसदेत बुलंद करणारा एकमेवाद्वितीय असा लोकनेता अशी ओळख असल्याने व समाजाच्या मनावर देवाप्रमाणे स्थान असल्याने हा समाज त्यांना देव्हा-यावर देव मानून पूजा करतो.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये** (Objective of Research) :

1. गोपीनाथ मुंढे यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
2. ओबीसी समाजासाठी केलेल्या संघर्षाचा आढावा घेणे.

**गृहीतके** (Hypothesis) :

1. गोपीनाथ मुंढे यांनी ओबीसी च्या उद्धारासाठी राजकारण व समाजकारण केले.
2. राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या बहुजनांना संघटित केले.

**संशोधन पद्धती** (Research Methodology) :

सदरील संशोधन पेपर लिहिण्यासाठी, तथ्य संकलनाच्या द्वितीय स्त्रोतांचा वापर केला आहे. ज्यात वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, संकेतस्थळे, ऑडिओ क्लीप, गोपीनाथ मुंढे यांचे संसदेतील भाषणांची व्हिडीओ क्लीप, अशा विविध साधनांचा आढावा घेऊन विश्लेषणात्मक पद्धतीच अवलंब करण्यात आला आहे.

**ओ.बी.सी. समाज आणि गोपीनाथ मुंढे :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आपण ज्या समाजात जन्म घेतला त्या समाजाच्या वेदना कमी करण्यासाठी कामी आलो पाहिजे या भूमिकेतून त्यांनी दीन-दलित व अन्यायग्रस्त समाजाच्या उद्धारासाठी पूर्णपणे समाजकेंद्री राजकारण केले. म्हणूनच लोकोत्तर लोकनेता म्हणून त्यांची ओळख आहे.

1) आठराविश्वे दारिद्र्य असलेल्या व प्रस्थापित मनुवादी विचाराच्या लोकांनी विविध जाती, प्रथामध्ये बांधून ठेवलेल्या समाजाला मुक्त करून त्यांचे घटनात्मक हक्क मागण्यासाठी त्यांच्यामध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य गोपीनाथ मुंढे यांनी केले. समाजातील दुःख, वेदना, रूढी-परंपरा याच त्यांना काम करण्यासाठी प्रवृत्त करत व कामाची दिशा दाखवत असत. म्हणून जात-पात, धर्म-पंथ या सर्व भिंतीच्या पलीकडे जाऊन दुःखीतांचे अश्रू पुसण्यासाठी अहोरात्र त्यांनी काम केले.

2) सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, मजूर, विविध जाती-धर्मामध्ये विभागलेला मागास समाज, मनुवादी विचारसरणीमुळे अंधश्रद्धेच्या जोखडाखाली दाबून ठेवला होता. त्यांना त्यांच्या एकजूटीची तकाद दाखवून संघर्ष करण्यासाठी एकत्र केले व त्यांच्या चळवळीचे नेतृत्व करून, राष्ट्रीय आंदोलन उभे करून, ओबीसी जनगणना करून,

राज्यघटनेमध्ये स्वतंत्र शेड्यूल तयार करून, त्यांच्या विकासासाठी तरतूद करण्यासाठी मुंढे साहेबांनी प्रयत्न केले.

3) विधिमंडळ आणि देशाच्या संसदेमध्ये सर्वत्र विखुरलेल्या ओबीसींच्या वेदना मांडून सर्व ओबीसी नेत्यांना एकत्र राजकीय शक्तीचे संघटन करण्यासाठी दिल्लीमध्ये प्रयत्न केले व राष्ट्रीय पातळीवरील ओ.बी.सी. चे नेतृत्व करून चळवळीला सुरुवात केली व सर्व समाज जागृत केला.

4) ओबीसींचे प्रश्न सोडवण्यासाठी राजकारणापलीकडे मैत्रीचे व पक्षापलीकडे सामाजिक जाणीवतेचे संबंध जपून समाजोद्धारासाठी काम करणारे एकमेव नेतृत्व असल्याने सर्व समाजातील लोक त्यांच्याकडे समस्या घेऊन येत असत, आणि साहेब त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करीत असत.

5) ओबीसी समाजातील भटके-विमुक्तांचे प्रश्न, व्यथा जाणून त्या सोडवण्यासाठी मा. भिकाजी दादा इदाते यांच्या नेतृत्वाखाली भटके-विमुक्त विकास संस्था स्थापन केली. या समितीच्या माध्यमातून या समाजाचे सर्वेक्षण करून त्यांच्या समस्या व उपाययासंबंधी सविस्तर अहवाल तयार करून घेतला व शिफारशींची अंमलबजावणी मा. मुंढे साहेबांनी करून घेतली. तसेच त्यासाठी एक स्वतंत्र मंत्रालय व त्यासाठी एक कॅबिनेट मंत्री, एक राज्यमंत्री असावा अशी व्यवस्था करून घेतली.

   युती शासनाच्या काळात मुंढे साहेबांनी इतर मागासवर्गातील लोकांना विविध शासनाच्या समित्यांमध्ये प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला.

6) मुंढे साहेबांनी ओ.बी.सी. व इतर बहुजन समाजातील लहान-मोठ्या समाजांचे मेळावे आयोजित करून समाज संघटित करून समस्या सोडवण्यासाठी व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अनेक मेळाव्यांना उपस्थित राहून प्रोत्साहनपर मार्गदर्शन करून आधार दिला. कोळी, माळी, बंजारा, वंजारी, धनगर, गोसावी, चांभार, कुंभार, परीट, लोहार, राजस्थानी, दलित, रूखी, मांग, गारूढी, पारधी अशा विविध जातींना संघटित करून हक्कासाठी भांडण्याचे धाडस देऊन विविध संधीचा लाभ मिळवून दिला. समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून प्रशासकीय क्षेत्र व राजकीय क्षेत्रामध्ये जाण्यास प्रवृत्त केले.

7) मराठ्यांनी राजकारण, सत्ताकारण आणि ब्राह्मणांनी प्रशासन चालवावं अशी अलिखित असलेली पद्धत त्यांनी मोडून ओ.बी.सी. बहुजन समाजाला राजकारण व समाजकारणामध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळवून दिली. तसेच शैक्षणिक अधिकार मिळवून देऊन प्रशासनामध्ये जाण्यासाठी सहकार्य मोठ्या प्रमाणात केले. त्यासाठी पक्षीय, राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व स्तरांमध्ये मैत्रीचे राजकारण त्यांनी केले.

8) भाजपा हा मनुवादी विचाराचा पक्ष असूनही त्याला मुंढे साहेबांनी बहुजन चेहरा देण्याचे काम केले. अनेक बहुजन लोकांना पक्षामध्ये संधी दिली. राजकीय प्रतिनिधित्व विविध संस्थामध्ये दिले. त्यामुळे शेटजी-भटजींचा पक्ष असूनही सर्व समावेशक रूप साहेबांनी दिल्यामुळे जनमाणसात हा पक्ष मोठा झाला व ओबीसी नेते त्यातून मोठे झाले, पण सध्या हे चित्र साहेबानंतरच्या काळात बदलू पाहत आहे.

**निष्कर्ष** (Conclusions) :

लोकनेते गोपीनाथ मुंढे हे महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेले व राष्ट्रीय पातळीवरील बहुजनांच्या गळ्यातील ताईत बनलेले ओबीसी नेतृत्व होय. इतर मागासवर्गीय लोकांच्या उद्धारासाठीच त्यांनी राजकीय व सामाजिक पातळीवर जनआंदोलने उभी करून सर्व जाती-धर्मात विखुरलेल्या लोकांना हक्कासाठी जागरूक केले. राजकारण व समाजकारणात नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध करून दिली. एक ओबीसींची वज्रमूठ निर्माण करून संघटितपणे संघर्ष करण्यासाठी सज्ज केले.

बारा बलुतेदारी पद्धतीने विविध प्रकारची सेवा देणा-या समाजाला सत्ताधारी बनवण्यासाठी प्रयत्न केले. विविध शासकीय-अशासकीय संस्थामध्ये प्रतिनिधित्व मिळवून दिले. सर्वसामान्य समाजाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी संसदेमध्ये आवाज उठवला. विविध सांसदीय आयुधाचा वापर करून सत्तेशी संघर्ष केला. संघर्ष यात्रा काढून समाज संघटित केला. ओबीसीची स्वतंत्र जनगणना करायला भाग पाडून राष्ट्रीय पातळीवर ओबीसींची चळवळ निर्माण करण्याचे श्रेय गोपीनाथ मुंढे यांनाच जाते.

'संघटित व्हा आणि हक्कासाठी संघर्ष करा' ही शिकवण मुंढे साहेबांनी समाजाला दिली आहे.

**संदर्भ** (Reference) :

1. आ. भाई गीरकर, सामाजिक जाणीव जगणारा नेता, साप्ताहिक विवेक, दि. 6 जुलै, 2014, पृ.22
2. विनोद तावडे, माझे मार्गदर्शक, लोकप्रभा : दि. 20 जून, 2014, पृ. 20
3. सुरेश द्वादशिवार, गोपीनाथ, साधना : दि. 21 जुलै, 2014, पृ. 13
4. https://mr.wikipedia.org/wiki
5. गोपीनाथ मुंढे यांचे युट्यूटब वरील संसदेतील भाषणे